**प्रेस नोट** **दिनांक ०४/०१/२०२२**

| | | |
|---|---|---|
| १ | ला प्र वि कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई |
| २ | गु र क्र | ०१/२०२२ |
| ३ | कलम | कलम ७ भ प्र अधि १९८८ |
| ४ | आरोपीचे नाव कार्यालयाचा पत्ता | लोकसेवक श्री अनिल मदनजी जाधव, वय ५२ वर्षे, वर्ग–१, सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, खेरवाडी, वांद्रे पूर्व, मुंबई–४०००५१ |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये ५,००,०००/– |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ५,००,०००/– |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रुपये ५,००,०००/– |
| ८ | थोडक्यात हकीगत | फिर्यादी हे टेडर स्किन इंटरनॅशनल कॉस्मेटोलॉजी अॅकेडमीमध्ये भागीदार असून त्यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ येथे त्यांच्या अॅकेडमी व त्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या वेगवेगळया कोर्सच्या मंजुरीकरिता अर्ज लोकसेवक यांचे कार्यालयामध्ये यापूर्वी केला होता. त्यासंदर्भातील सर्व कागदपत्राची पुर्तता त्यांनी केली असून त्याबाबत फिर्यादी यांना जुलै–२०२१ मध्ये पूर्वमंजूरी प्राप्त झाली आहे. नमूद प्रकरणाबाबत अंतिम मंजूरी मिळणेकरिता यातील आलोसे यांनी रू. ५,००,०००/– इतक्या लाचेची मागणी फिर्यादी यांचेकडे केली.<br>फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी दि ०७/१२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार अर्ज दिला.<br>नमूद तक्रारीच्या अनुषगाने दि १४/१२/२०२१ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडे रू. ५,००,०००/– इतक्या रकमेची लाच स्वरूपात मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केले.<br>आज दि ०४/०१/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी मागणी केलेल्या रू. ५,००,०००/– इतकी लाचेची रक्कम फिर्यादी यांच्याकडून स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणून त्यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

( आबासाहेब पाटील )
सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

**संपर्क**:–लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी,मुंबई
टोल फ्री क्र १०६४, दूरध्वनी क्र ०२२–२४९२१२१२,
फॅक्स क्र ०२२–२४९२२६१८,
वेबसाईट – acbmaharashtra.gov.in, ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,फेसबुक www.facebook.com Maharashtra ACB.
मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net